Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# अहमदनगर जिल्ह्यातील नगदी पिकांच्या वितरणाचा अभ्यास

**डॉ. गुजर बापुराव त्रिंबक**
शाम गदळे कला महाविद्यालय दहिफळ (वड)
ता. केज जि. बीड
मो. ९७६४४२५०८२

**सारांश :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील नगदी पिकांच्या वितरणाचा तालुकानिहाय अभ्यास केला आहे. अहमदनगर जिल्हा हा सह्याद्री पर्वताच्या पूर्वेस येत असल्याने पर्जयछायेच्या प्रदेशात येतो. पर्जन्यमानामध्ये असमानता असतानाही जिल्ह्यात कृषी क्षेत्रामध्ये चांगला विकास झाला आहे. हवामान, मृदा, जलसिंचन, पर्जन्यमान या सर्व घटकांचा परिणाम जिल्ह्यातील पिक वितरणावर होत असतो. याचा अभ्यास या शोध निबंधामध्ये केला आहे.

**प्रस्तावना :-**

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानाला जातो. भारतातील ७० टक्के लोक कृषी व्यवसायावर अवलंबून आहेत. अहमदनगर जिल्हा हा कृषी क्षेत्रामध्ये अग्रेसर मानला जात असला तरी जिल्ह्यामध्ये पिकांच्या वितरणामध्ये मोठ्या प्रमाणावर विविधता दिसून येते. गंगापूर, भंडारदरा, मुळा, घोड, कुकडी इत्यादी ओक मोठी धरणे जिल्ह्यात आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रावर झाला आहे आणि त्यामुळे जिल्ह्यातील पिक प्रारुपामध्ये तालुकानिहाय मोठ्या प्रमाणावर विविधता दिसून येते. जिल्ह्यातील सरासरी पर्जय ५६७ मि.मी. असून पर्जय वितरणामध्ये असमानता दिसून येते. ऊस हे जिल्ह्यातील प्रमुख नगदी पिक असून महाराष्ट्रातील एकूण ऊस उत्पादनापैकी १६% ऊस उत्पादन अहमदनगर जिल्ह्यामध्ये होते. तसेच जिल्ह्यात इतर अनेक प्रकारचे नगदी पिके घेतली जातात.

**उद्दिष्टे :-**

१. अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय नगदी पिकांखालील क्षेत्राचा अभ्यास करणे.
२. अहमदनगर जिल्ह्यातील स्थलपरत्वे झालेल्या पिक बदलांचा अभ्यास करणे.

**माहिती संकलन आणि संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये प्रामुख्याने द्वितीय माहिती सामग्रीचा आधार घेतला आहे. त्यासाठी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा गॅझेटियर, कृषी कार्यालय यांच्याकडून माहिती संकलन करून मिळालेल्या माहितीचे सांख्यिकीय पद्धतीच्या साह्ययने आकडेवारीचे प्रथक्करण करण्यात आले आहे.

**अभ्यास क्षेत्र :-**

महाराष्ट्राच्या मध्यभागी, उत्तरेस गोदावरी आणि दक्षिणेस भीमा या नद्यांच्या खोऱ्यात वसलेल्या अहमदनगर जिल्ह्याचे उत्तर अक्षांश १८०.२‘ ते १९०.९‘ अंश व पूर्व रेखांश ७३०.९‘ ते ७५०.५‘ अंश असे भौगोलिक स्थान आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने अहमदनगर जिल्ह्याचा महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक असून एकूण क्षेत्रफळाच्या ५.६६ टक्के एवढे क्षेत्र अहमदनगर जिल्ह्याने व्यापलेले आहे. जिल्ह्यात एकूण १४ तालुक्यांचा समावेश आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस नाशिक जिल्हा, ईशान्य दिशेस औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे, दक्षिणेस सोलापूर जिल्हा व पश्चिमेस ठाणे व पुणे हे जिल्हे आहेत. जिल्ह्यामध्ये अहमदनगर, पारनोर, पाथर्डी, शेवगाव, कर्जत, श्रीगोंदा, जामखेड, श्रीरामपूर, नेवासा, राहुरी, राहाता, अकोले, संगमनेर, कोपरगाव हे तालुके आहेत.

**अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय नगदी पिकांचे वितरण २०११-१२ (क्षेत्र हेक्टरमध्ये)**

| अ.क्र. | पिके तालुके | कापूस | ऊस | मका | कांदा | भूईमूग | सुर्यफूल | करडई | फळवर्गीय पिके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अकोले | ०० | १९३५ | ६८ | ८३५ | ५५० | ०० | ०० | २४० |
| | | ०० | २.१६ | ०.४५ | २.८८ | १०.४२ | ०० | ०० | १.३१ |
| २. | संगमनेर | ११४१ | ९२८२ | २५४१ | ५९४७ | ११९२ | १४७ | ११ | ३१९८ |
| | | १.९० | १०.३९ | १६.९१ | २०.५३ | २२.५९ | १४.९८ | ०.१७ | १७.५३ |
| ३. | कोपरगाव | ५१६२ | ३२५२ | ६१८५ | ५५२७ | ११५ | ३२६ | २ | ७५७ |
| | | ८.६१ | ३.६४ | ४१.१७ | १९.०८ | २.१८ | ३३.२३ | ०.०३ | ४.१५ |
| ४. | राहाता | १०७३ | ३३१४ | १२८३ | १३९३ | १८४ | ०० | ०० | २३९२ |
| | | १.७९ | ३.७१ | ८.५४ | ४.८१ | ३.४८ | ०० | ०० | १३.११ |
| ५. | श्रीरामपूर | ३०६० | २३०२ | ८०४ | १३१५ | १४१ | ६८ | १० | ४२१ |
| | | ५.१० | २.५८ | ५.३५ | ४.५४ | २.६७ | ६.९३ | ०.१५ | २.३१ |
| ६. | नेवासा | २८००६ | ४७१४० | ५५० | १९२१ | ३१९ | ३२ | १९ | ३९५४ |
| | | ४६.७२ | ५२.७७ | ३.६६ | ६.६३ | ६.०४ | ३.२६ | ०.२९ | २१.६८ |
| ७. | शेवगाव | १४३३० | १९० | ६५ | ९०८ | ३३ | २५ | १७ | ३३७ |
| | | २३.९१ | ०.२१ | ०.४३ | ३.१३ | ०.६२ | २.५४ | ०.२६ | १.८५ |
| ८. | पाथर्डी | ४५९० | १४३० | १३९ | २२ | ११६ | ०० | ९० | २४४२ |
| | | ७.६६ | १.६० | ०.९२ | ०.०७ | २.१९ | ०० | १.३९ | १३.३९ |
| ९. | अ.नगर | १९ | १५२ | ४०२ | ९६६ | २७१ | १४६ | ४७६ | २६८ |
| | | ०.०३ | ०.१७ | २.६७ | ३.३३ | ५.१४ | १४.८८ | ७.३६ | १.४६ |
| १०. | राहुरी | ३५० | १५२८५ | ९८० | १८४८ | ३४० | २१० | ९ | ५३७ |
| | | ०.५८ | १७.११ | ६.५२ | ६.३८ | ६.४४ | २१.४० | ०.१३ | २.९४ |
| ११. | पारनेर | २२ | १२९६ | ५९१ | ४६४९ | १७०८ | ०० | ५८१२ | ७७९ |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

| अ.क्र. | पिके तालुके | कापूस | ऊस | मका | कांदा | भूईमूग | सुर्यफूल | करडई | फळवर्गीय पिके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०.०३ | १.४५ | ३.९३ | १६.०५ | ३२.३७ | ०० | ८९.९१ | ४.२७ |
| १२. | श्रीगोंदा | ७ | २३९९ | १०७५ | २३२५ | १२५ | ५ | ३ | १०७२ |
| | | ०.०१ | २.६८ | ७.१५ | ८.०२ | २.३६ | ०.५० | ०.०४ | ५.८७ |
| १३. | कर्जत | ३९८ | ८०७ | २९ | ८६६ | १२० | १२ | १४ | ४३९ |
| | | ०.६६ | ०.९० | ०.१९ | २.९९ | २.२७ | १.२२ | ०.२१ | २.४० |
| १४. | जामखेड | १७८२ | ५४७ | ३११ | ४३७ | ६२ | १० | ०० | १४०० |
| | | २.९७ | ०.६१ | २.०७ | १.५१ | १.१७ | १.०१ | ०० | ७.६७ |
| | **एकूण** | **५९९३९** | **८९३३१** | **१५०२३** | **२८९५८** | **५२७६** | **९८१** | **६४६४** | **१८२३६** |
| | | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** | **१००** |

स्त्रोत :- अहमदनगर जिल्हा समाजिक व आर्थिक समालोचन, २०११-१२.

वरील तक्त्याच्या निरीक्षणावरून असे दिसून येते की, जिल्ह्यामध्ये कापसाचे क्षेत्र हे नेवासा (४६.७२%) तालुक्यामध्ये सर्वात जास्त प्रमाणात आहे. त्या खालोखाल शेवगाव (२३.९१%) तालुक्याचा क्रमांक लागतो. जिल्ह्यातील अकोले, अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा या तालुक्यांमध्ये कापूस लागवडीखालील क्षेत्र कमी आहे. भूईमूग पिकाखाली जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्र हे पारनेर (३२.३७%) तालुक्यात आहेत. तर त्यांतर संगमनेर (२२.५९%) तालुक्याचा नंबर लागतो. शेवगाव (०.६२%) व जामखेड (१.१७%) तालुक्यात भूईमुगाचे क्षेत्र कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. ऊस हे जिल्ह्यातील महत्त्वाचे नगदी पीक असून महाराष्ट्रातील एकूण ऊस उत्पादनापैकी १६% ऊस उत्पादन अहमदनगर जिल्ह्यात होते. जिल्ह्यातील सर्वात जास्त ऊस लागवडी खालील क्षेत्र हे नेवासा (५२.७७%) तालुक्यामध्ये असल्याचे दिसून आले आहे. तर त्यानंतर ऊस पिक लागवडीच्या क्षेत्रामध्ये राहुरी (१७.११%) तालुक्याचा क्रमांक लागतो. जिल्ह्यातील शेवगाव, अहमदागर, कर्जत, जामखेड या तालुक्यात ऊसाचे क्षेत्र कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. जिल्ह्यातील मका पिकाच्या वितरणापैकी ४१.१७% क्षेत्र हे कोपरगाव तालुक्याने व्यापले आहे. त्यांतर संगमनेर (१६.९१%) तालुक्याचा मका पिकाच्या क्षेत्रामध्ये दुसरा क्रमांक आहे. अकोले, शेवगाव, पाथर्डी, कर्जत या तालुक्यांमध्ये मका पिकाचे क्षेत्र कमी आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील सूर्यफूलाच्या लागवड क्षेत्रापैकी (३३.२३%) क्षेत्र हे कोपरगाव तालुक्यामध्ये आहे. तर त्यानंतर राहुरी, संगमनेर या तालुक्यांत अनुक्रमे २१.४०%, व १४.९८% एवढे क्षेत्र सूर्यफूल पिकाखाली आहे. अकोले, राहाता, पाथर्डी व पारनेर या तालुक्यांमध्ये सूर्यफूल लागवडीखालील क्षेत्र नगण्य असल्याचे दिसून आले आहे. कांदा हे एक जिल्ह्यातील महत्त्वाचे नगदी पिक म्हणून समोर येत आहे. अहमदनगर जिल्ह्यात कांदयाचे सर्वात जास्त लागवडीखाली क्षेत्र हे संगमनेर (२०.५३%) तालुक्यात आढळून आले आहे. तर त्यानंतर कोपरगाव (१९.०८%), पारनेर

(१६.०५%) या तालुक्यातही मोठ्या प्रमाणावर कांद्याची लागवड होते. पाथर्डी तालुक्यात कांद्याचे उत्पादन कमी होत असल्याचे दिसून आले आहे. करडई पिकाखालील क्षेत्रामध्ये जिल्ह्यातील पारनेर (८९.९१%) तालुका अग्रेसर असून त्या खालोखाल अहमदनगर जिल्ह्याचा क्रमांक लागतो. जिल्ह्यातील फळवर्गीय पिकाखालील क्षेत्रापैकी २१.६८% क्षेत्र नेवासा तालुक्यात असल्याचे निदर्शनास आले आहे. तर त्यानंतर संगमनेर (१७.५३%) तालुक्याचा क्रमांक लागतो. अकोले, शेवगाव, अहमदनगर या तालुक्यांमध्ये फळवर्गीय पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र कमी असल्याचे दिसून आले आहे.

**संदर्भ :-**


१. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, महाराष्ट्र शासन, सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा-२०१३.

२. महाराष्ट्र शासन गॅझेटियर, अहमदनगर जिल्हा, १९७६.

३. माजिद हुसैन (२००४) : कृषी भूगोल, रावत पब्लिकेशस, जयपूर.

४. अरुण कुंभारे (२००४) : कृषी भूगोल, पायल पब्लिकेशस, पुणे.

5. Singh Jasbir & Dhillan (2000): Agricultural Geography, Tata Mc-Grow Hill Publishing Co. Ltd., New Delhi.

6. Date V. S. & Gupte S. C. (1979): Slope and Agricultural Land Use : Analytical study with reference to Puna District (Maharashra) Transaction, Institute of Indian Geographers.

7. Dhinkaur (1991) : Changing Pattern of Agricultural Land Use, Rawat Publication, Jaipur.